आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२५ फेब्रुवारी २०२५ मंगळवार

**ठळक बातम्या**

- विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन / ॲडवांटेज आसाम या गुंतवणूकदार संमेलनाच्या दुसऱ्या टप्प्याचं गुवाहाटीत उद्घाटन

- दिल्ली विधानसभेच्या विशेष अधिवेशनात आम आदमी पार्टीच्या बारा आमदारांचं निलंबन

- संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत रशियाचा निषेध करणाऱ्या युक्रेनच्या ठरावाला अमेरिकेचा विरोध, भारत आणि चीन तटस्थ

**आणि**

- आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा ऑस्ट्रेलियाशी सामना

**<><><><><>**

बदलत्या भूराजकीय आणि आर्थिक परिस्थितीत साऱ्या जगाचं लक्ष भारतावर केंद्रीत झालं असून विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करणारी धोरणं सरकार राबवत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ॲडवांटेज आसाम या गुंतवणूकदार संमेलनाच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन केल्यानंतर आज गुवाहाटी इथं ते बोलत होते....

**होल्ड- बाईट- नरेंद्र मोदी- *दुनिया की नजरें भारत के निओ मिडलक्लासपर हैं.....***

कारखाना क्षेत्राची वाढ आणि रोजगारनिर्मिती याकरता आवश्यक पायाभूत सोयी सुविधा आणि उद्योगांना अनुकूल वातावरण देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले. पूर्वेकडच्या देशांबरोबर भारताच्या व्यापारात आसामची भूमिका महत्त्वाची असून विशेषतः सेमीकंडक्टर निर्मितीत आसाम देशाचं नेतृत्व करेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मेक इन इंडिया मार्फत सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना सरकार प्रोत्साहन देत आहे, असं मोदी म्हणाले. केंद्र आणि आसाम मधल्या भाजपा सरकारने एकत्रितपणे राबवलेल्या विविध

विकास योजनांची माहिती त्यांनी दिली. आसामचे राज्यपाल लक्ष्मणप्रसाद आचार्य, मुख्यमंत्री हिमंत बिस्व सरमा, केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे, इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. अदानी, रिलायन्स आणि टाटा या उद्योगसमूहांच्या प्रमुखांची भाषणं यावेळी झाली. उर्जानिर्मिती, इलेक्ट्रॉनिक्स, सेमीकंडक्टर, अन्नप्रक्रीया, आतिथ्य, या क्षेत्रात तसंच स्थानिक कारागीरांच्या कौशल्याला वाव देणारी बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी मोठी गुंतवणूक करण्याच्या घोषणा या उद्योजकांनी केल्या. दोन दिवस चालणाऱ्या या गुंतवणूकदार संमेलनात विविध पातळ्यांवरची एकूण १४ सत्रं होणार आहेत, तसंच २४० हून अधिक उद्योगांची दालनं सादर करण्यात येत आहेत.

<><><><><>

केंद्र सरकारने अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्यक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती हिसकावून घेतली आहे, असा आरोप काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे केला. शिष्यवृत्ती बंद केल्यामुळे सरकारची ‘सब का साथ सब’ का विकास ही घोषणा या घटकांची थट्टा करणारी आहे, अशी टीका त्यांनी केली. केंद्र सरकारनं फक्त शिष्टवृत्तीत कपात केली असं नाही, तर दरवर्षी शिक्षणासाठीच्या निधीत २५ टक्के निधी कमी केला आहे, असा आरोपही त्यांनी केला.

<><><><><>

दिल्लीचे नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या अभिभाषणाच्या वेळी घोषणाबाजी केल्यामुळे विरोधी पक्षनेत्या आतिशी यांच्यासह आम आदमी पार्टीच्या बारा आमदारांना विधानसभा अध्यक्ष विजेंदर गुप्ता यांनी आज निलंबित केलं. गोपाल राय, वीर सिंग धिंगन, मुकेश अहलावत, चौधरी झुबैर अहमद, अनिल झा, विशेष रवी आणि जरनैल सिंग यांचा निलंबन झालेल्या आमदारांमधे समावेश आहे. त्यानंतर निलंबित आमदारांनी विधानभवनाच्या परिसरात निदर्शनं केली. मुख्यमंत्री कार्यालयातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं छायाचित्र काढून भाजपा सरकारने त्यांचा अपमान केल्याचा आरोप आतिशी यांनी केला आहे.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशात प्रयागराज इथं संगमावर सुरु असलेल्या महाकुंभ पर्वाचा उद्या महाशिवरात्रीच्या दिवशी समारोप होणार आहे. १४४ वर्षांनी येणाऱ्या या महापर्वात आज दुपारी १२ वाजेपर्यंत ६८ लाखापेक्षा अधिक भाविकांनी स्नान केलं. अमृतस्नान करण्याचा उद्या शेवटचा दिवस असल्यानं गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनानं वाहतुकीचं नियमन केलं आहे.

**<><><><><>**

भारतातल्या खासगी क्षेत्रातल्या कंपन्यांनी २०२३-२४ या आर्थिक वर्षात नफा कमावला असून कर्जही कमी केल्याची माहिती भारतीय रिझर्व्ह बँकेने आपल्या अहवालात दिली आहे. या कंपन्यांचा चालु गुंतवणूक नफा गेल्या वर्षी ४ पूर्णांक २ शतांश टक्के इतका होता, त्यात वाढ होऊन तो आता १५ पूर्णांक ३ दशांश टक्के झाला आहे. तर उत्पादन नफ्यात १३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांची वाढ झाली आहे. सेवाक्षेत्रातलं उत्पादन ७ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांवरून ३८ पूर्णांक १ दशांश टक्के इतकं झालं आहे, असंही या अहवालात म्हटलं आहे.

**<><><><><>**

बंगालच्या उपसागरात आज सकाळी सहा वाजून दहा मिनिटांनी ५.१ दशांश  रिक्टर स्केल तीव्रतेचे भूकंपाचे झटके बसले. यामुळे ओदिशातल्या भुवनेश्वर, पुरी, पारादीप, बारीपाडा, संबलपूर, अंगुल आणि बालासोर सारख्या भागांमध्ये भूकंपाचे सौम्य झटके जाणवले. हा भूकंप समुद्राच्या पृष्ठभागाखाली ९१ किलोमीटर खोलवर झाला होता. यात कोणतीही जीवितहानी आणि मालमत्तेचं नुकसान झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून पाच दिवस बिहार, मध्य प्रदेश आणि गुजरात या तीन राज्यांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्या आज बिहारमध्ये पाटणा वैद्यकीय महाविद्यालयाच्या शताब्दी महोत्सवाला उपस्थित राहणार आहेत. उद्या, मध्य प्रदेशात छत्तरपूर इथं बागेश्वर जनसेवा समितीच्या वतीनं आयोजित सामूहिक विवाह सोहळ्याला राष्ट्रपती उपस्थित

राहतील. त्यानंतर त्या गुजरात इथे स्टॅच्यू ऑफ यूनिटीला भेट देऊन आदरांजली अर्पण करतील आणि केवडिया इथं नर्मदा आरतीला उपस्थित राहतील.

**<><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत युक्रेनने मांडलेल्या रशियाचा निषेध करणाऱ्या ठरावावर भारत आणि चीन हे दोन्ही देश अलिप्त राहिले आहेत. तर ठरावाच्या विरोधात अमेरिका आणि रशिया या दोन्ही देशांनी मतदान केलं आहे. ठरावाच्या बाजूनं ९३, विरोधात १८ आणि ६५ देश गैरहजर राहिल्यानं हा ठराव मंजूर करण्यात आला आहे.  दरम्यान सध्या अमेरिका रशियासोबत युक्रेनसंबधी शांती-प्रस्तावावर चर्चा करत आहे.

**<><><><>**

व्हेवज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिटमधे पोस्टर मेकिंग स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. यात भारतीय सिनेमांचे पोस्टर्स स्पर्धकांना बनवायचे आहेत. या स्पर्धेसाठी आतापर्यंत २९६ जणांनी नोंदणी केली आहे. यात स्पर्धकांना हाताने तसंच डिजिटल साधनांचा वापर करून पोस्टर्स बनवता येतील. वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट मुंबईत १ ते ४ मे या कालावधीत होणार आह. जगभरातल्या माध्यम आणि मनोरंजन उद्योगाचं लक्ष भारताकडे वेधणं हे या समिटचं उद्दिष्ट आहे.

**<><><><>**

आयसीसी चॅम्पियन्स करंडक क्रिकेट स्पर्धेत आज दक्षिण आफ्रिकेच्या संघाचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. पाकिस्तानमध्ये रावळपिंडी मैदानावर होणारा हा सामना दुपारी अडीच वाजता सुरू होईल. याच स्पर्धेत काल झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं बांगलादेशवर ५ गडी राखून विजय मिळवला. या विजयामुळे पाकिस्तान आणि बांगलादेश हे दोन्ही संघ या स्पर्धेतून बाहेर पडले आहेत, तर भारत आणि न्यूझीलंडने उपांत्य फेरीतलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. अ गटात आतापर्यंत झालेल्या सामन्यांमध्ये, दोन विजयांसह भारत आणि न्यूझीलंडचे प्रत्येकी चार गुण आहेत. भारत आणि न्यूझीलंड यांच्यातला पुढचा सामना २ मार्च रोजी होणार आहे.

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी आकडेवारीवर आधारित विदा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीनं केंद्रीय सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय ‘इनेव्हेट विथ गो आयस्टॅट्स’ ही हॅकेथॉन आयोजित करत आहे. मायगोव्ह मंचावर ही स्पर्धा होणार असून त्यात सहभागासाठी आजपासून येत्या ३१ मार्चपर्यंत नोंदणी करता येईल. पदवी तसंच पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे विद्यार्थी भाग घेऊ शकतील. सर्वोत्कृष्ट ३० स्पर्धकांना रोख पारितोषिकं देण्यात येतील.

**<><><><><>**

मुंबई, ठाणे आणि शेजारच्या जिल्ह्यांमधे पुढचे दोन दिवस उष्णतेची तीव्र लाट येण्याचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे. या परिसरातले तापमान ३७ ते ३८ अंश सेल्सिअस पर्यंत वाढेल, असा अंदाज आहे. त्यामुळे हवामान विभागानं यलो अलर्ट जारी केला आहे. भारतीय हवामान विभागाच्या शास्त्रज्ञ सुषमा नायर यांनी सांगितलं…

**होल्ड बाईट नायर**

**//<><><><><>//**